# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** नागपूर महानगरपालिकेच्या शाळांमध्ये "ध्यानयोग शिबीर"राबविण्यास
**{शिक्षण विभाग}** परवानगी देण्याबाबत.

नागपूर महानगरपालिकेच्या शाळेत शिकणाऱ्या मुलांचे व शाळाबाह्य मुलांचे विकासासाठी तसेच त्यांच्या पालकांकरिता "मध्य भारत समर्पन ध्यानयोग केंद्र नागपूर" च्या माध्यमातुन नागपूर महानगरपालिकेच्या शाळांमध्ये ध्यानयोगाशी संबधीत उपक्रम राबविण्याच्या परवानगीकरिता मध्य भारत समर्पन ध्यानयोग केंद्र नागपूर (श्री शिवकृपानंद स्वामी फाऊंडेशन)यांचेकडून प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

मध्य भारत समर्पण ध्यानयोग केंद्र, नागपूर यांच्या पत्रानुसार हा उपक्रम **शैक्षणिक तासिका वगळून** विनामुल्य संलग्न यादीत नमुद केल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या २२ शाळांमध्ये आयोजीत करण्यात येईल. जेणेकरुन शैक्षणिक कार्यात अडथळा निर्माण होणार नाही.

महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांकरिता श्री शिवकृपानंद स्वामी फाऊंडेशन मार्फत ध्यान योग शिबीर हा उपक्रम राबविल्यास विद्यार्थ्यांचा मानसीक व बौद्धीक विकास होऊन ते जबाबदार नागरीक बनतील. सदर उपक्रमाअंतर्गत मनपाची कोणतीही मालमत्ता / साहित्य हस्तांतरीत होत नसुन शालेय प्रगतीसाठी मनपा शाळा काही कालावधीसाठी अशैक्षणिक वेळेत ध्यान प्रशिक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावयाच्या आहे. व सदर उपक्रमासाठी संबंधीत संस्थेस कोणताही निधी / खर्च द्यावयाचा नाही.

सदर उपक्रम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक तसेच सामाजिक प्रगतीस पोषक असल्याने यादीतील नमुद शाळांमध्ये सदर उपक्रम प्रायोगीक तत्वावर ११ महिन्यांसाठी मंजूरी देणे व आवश्यकतेनुसार प्रकल्पाच्या उपयोगीतेबाबत आकलन करुन त्यास पुन्हा ११ महिने मुदतवाढ देण्याचा अधिकार मा. आयुक्त, मनपा, नागपूर यांचेकडे प्रदान करण्याची बाब विचारात घेणे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :-** 434/**मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 26/06/2023

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिकेच्या शाळांमध्ये "ध्यानयोग शिबीर"राबविण्यास परवानगी देण्याबाबत.

नागपूर महानगरपालिकेच्या शाळेत शिकणाऱ्या मुलांचे व शाळाबाह्य मुलांचे विकासासाठी तसेच त्यांच्या पालकांकरिता "मध्य भारत समर्पन ध्यानयोग केंद्र नागपूर" च्या माध्यमातुन नागपूर महानगरपालिकेच्या शाळांमध्ये ध्यानयोगाशी संबधीत उपक्रम राबविण्याच्या परवानगीकरिता मध्य भारत समर्पन ध्यानयोग केंद्र नागपूर (श्री शिवकृपानंद स्वामी फाऊंडेशन)यांचेकडून प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

मध्य भारत समर्पण ध्यानयोग केंद्र, नागपूर यांच्या पत्रानुसार हा उपक्रम **शैक्षणिक तासिका वगळून** विनामुल्य संलग्न यादीत नमुद केल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या २२ शाळांमध्ये आयोजीत करण्यात येईल. जेणेकरुन शैक्षणिक कार्यात अडथळा निर्माण होणार नाही.

महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांकरिता श्री शिवकृपानंद स्वामी फाऊंडेशन मार्फत ध्यान योग शिबीर हा उपक्रम राबविल्यास विद्यार्थ्यांचा मानसीक व बौद्धीक विकास होऊन ते जबाबदार नागरीक बनतील. सदर उपक्रमाअंतर्गत मनपाची कोणतीही मालमत्ता / साहित्य हस्तांतरीत होत नसुन शालेय प्रगतीसाठी मनपा शाळा काही कालावधीसाठी अशैक्षणिक वेळेत ध्यान प्रशिक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावयाच्या आहे. व सदर उपक्रमासाठी संबंधीत संस्थेस कोणताही निधी / खर्च द्यावयाचा नाही.

सदर उपक्रम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक तसेच सामाजिक प्रगतीस पोषक असल्याने यादीतील नमुद शाळांमध्ये सदर उपक्रम प्रायोगीक तत्वावर ११ महिन्यांसाठी मंजूरी देणे व आवश्यकतेनुसार प्रकल्पाच्या उपयोगीतेबाबत आकलन करुन त्यास पुन्हा ११ महिने मुदतवाढ देण्याचा अधिकार मा. आयुक्त, मनपा, नागपूर यांचेकडे प्रदान करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**